नवी दिल्ली येथे दि.१४ ते १७ जुलै, २०२६ दरम्यान आयोजित BHARAT TEX, २०२६ या कार्यक्रमामध्ये राज्य शासनाने सहभागी होणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण - १२२६/प्र.क्र.३२/टेक्स -५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १३ एप्रिल, २०२६

वाचा :-

१. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. धोरण २०२३/प्र.क्र.८१/ टेक्स-५, दि.०२.०६.२०२३.
२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण-२०२३/प्र.क्र.१०६/ टेक्स-५, दि.०३.११.२०२३.
३. सचिव, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार यांचे दि.२३.०३.२०२६ रोजीचे अ. शा. पत्र.

प्रस्तावना :-

BHARAT TEX, २०२६ हा भारत टेक्स ट्रेड फेडरेशन (BTTF) द्वारे आयोजित करण्यात येणारा जागतिक वस्त्र कार्यक्रम आहे, ज्यामध्ये आघाडीच्या कापड निर्यात प्रोत्साहन परिषदा (EPCs) आणि संघटनांचा समावेश आहे आणि याला भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाचे समर्थन आहे. सदर कार्यक्रम दि.१४ ते १७ जुलै, २०२६ दरम्यान नवी दिल्ली येथील प्रतिष्ठित भारत मंडपम येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमात राज्य शासनाने सपोर्टिंग स्टेट पार्टनरशिप (Supporting State Partnership) म्हणून सहभागी होण्यासाठी मा.मंत्री (वस्त्रोद्योग) महोदयांनी मान्यता प्रदान केली आहे. या मान्यतेनुसार नवी दिल्ली येथे दि.१४ ते १७ जुलै, २०२६ दरम्यान आयोजित BHARAT TEX, २०२६ या कार्यक्रमामध्ये राज्य शासन सपोर्टिंग स्टेट पार्टनरशिप म्हणून राज्य शासनाने सहभागी होण्यासंदर्भात प्रशासकीय आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

BHARAT TEX, २०२६ हा भारत टेक्स ट्रेड फेडरेशन (BTTF) द्वारे आयोजित करण्यात येणारा जागतिक वस्त्र कार्यक्रम आहे, ज्यामध्ये आघाडीच्या कापड निर्यात प्रोत्साहन परिषदा (EPCs) आणि संघटनांचा समावेश आहे आणि याला भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाचे समर्थन आहे. सदर कार्यक्रम दि.१४ ते १७ जुलै, २०२६ दरम्यान नवी दिल्ली येथील प्रतिष्ठित भारत मंडपम येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमात राज्य शासनाने सपोर्टिंग स्टेट पार्टनरशिप (Supporting State Partnership) म्हणून सहभागी होण्यास तसेच या कार्यक्रमासाठीची फीस रु.२.०० कोटी आणि २०० चौ.मी. जागेमध्ये पॅव्हेलियन व इतर स्टॉल उभारणीकरिता लागणारा अंदाजित रु.१.०० कोटी असे एकूण अंदाजित रु.३.०० कोटी तसेच आवश्यक जीएसटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्चात नमूद रु.१.०० कोटी हा खर्च अंदाजित असून त्यामध्ये वाढ झाल्यास त्याप्रमाणे वस्त्रोद्योग विभागाकडून खर्च अदा करण्यात येईल.

२. BHARAT TEX, २०२६ या कार्यक्रमासाठी होणारा खर्च खालील नमुद केलेल्या लेखाशिर्षामधून भागविण्यात येईल.

"मागणी क्रमांक व्ही-२,
२८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग,
(००) (११०), संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था,
(०३) (०५) वस्त्रोद्योग विभागाचा प्रशासकीय खर्च, वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ च्या अंमलबजावणीच्या संबंधित खर्च, प्रचार प्रसिध्दी, प्रकल्प व्यवस्थापन एजन्सी संबंधित खर्च व इतर आनुषंगीक खर्चासाठीची योजना (२८५१ ७४६३) ३३ अर्थसहाय्य"

३. BHARAT TEX, २०२६ या कार्यक्रमासाठी आवश्यक अंदाजित रु.३.०० कोटी तसेच आवश्यक GST इतकी रक्कम वस्त्रोद्योग विभागाच्या अखत्यारीत असलेल्या महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडून घेऊन खर्च करण्यात येईल आणि नियोजन व वित्त विभागाने उपरोक्त

नमूद लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळास करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०४१३१७३७२७६७०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

PRAMOD GANPATRAO PAWAR

Digitally signed by PRAMOD GANPATRAO PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=ba1df963775f8ead7f10c7f6fad8e2573f437f35d4b00e09a9b9c0ccdbf0d42a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5D6B51FDDC1FD566C46A6440D68EF83795379225572F777B66113D5833F98B04, cn=PRAMOD GANPATRAO PAWAR
Date: 2026.04.13 17:57:59 +05'30'

**(प्रमोद पवार)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर.
७. संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मुंबई.
९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
१०. महालेखापाल, (लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
११. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
१२. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई.
१३. वित्त विभाग (व्यय-२/अर्थ-१३), मंत्रालय, मुंबई.
१४. अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (३ प्रती), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. वस्त्रोद्योग विभागातील सर्व कार्यासने.